Estd. 1962
NAAC "A++" Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## परिपत्रक

सन 2026–27 ते 2028–29 या तीन वर्षाच्या कालावधीकरीता नविन प्रमुख अग्रणी महाविद्यालयाची निवड करण्यात येणार आहे. या संदर्भात ज्या महाविद्यालयांना अग्रणी महाविद्यालय म्हणून कामकाज करावयाचे आहे. अशा महाविद्यालयांकरीता विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Affiliation – The Scheme of Lead College येथे **Application Form for Lead College** या शिर्षकान्वये अर्ज उपलब्ध आहे. तसेच अग्रणी महाविद्यालय योजनेची नियमावली व उद्दीष्टे *(Broad Outline of the Lead Colleges)* उपलब्ध आहे.

ज्या महाविद्यालयांना / मान्यता प्राप्त संस्थांना अग्रणी महाविद्यालय म्हणून काम करावयाचे आहे अशा महाविद्यालय/ मान्यता प्राप्त संस्था यांनी उपरोक्त नमुद केलेल्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या नियमावलीमधील अटीस अधिन राहून नियमावलीनुसार पात्र असलेल्या महाविद्यालयांनी अर्ज विहित नमुन्यात व विहित मुदतीमध्ये करावा. तसेच ज्या महाविद्यालयांनी मागील तीन वर्षामध्ये कामकाज केले आहे व पुढील तीन वर्षासाठी काम करणेस तयार आहेत अशा महाविद्यालयांनी सुध्दा विहित अर्ज सादर करणे आवश्यक आहे. इच्छुक महाविद्यालयांनी त्यांच्या संस्थेच्या शिफारसीसह अर्ज विद्यापीठ कार्यालयास हार्ड कॉपीमध्ये दि. 30 एप्रिल, 2026 पूर्वी सादर करावेत. तद्नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. सोबत विहित अर्ज आपल्याकडे पाठवून देत आहोत.

आदेशावरून,

उपकुलसचिव

संदर्भः– शिवाजी वि./अग्रणी महा./348
दिनांक :– 16 APR 2026

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.